"Dissemination of Education for Knowledge, Science and Culture"

- Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

# Vivekanand College, Kolhapur

***(Autonomous)***

# Best Practice

## "A scientific Study of Kirnotsav in Mahalaxmi (Ambabai) Temple, Kolhapur during 'Dakshinayan' and 'Uttarayan' of Sun"

by

## Department of Physics and IQAC

in

**2020 – 21**

Submitted by

***Head of the Department,***

***Department of Physics, Vivekanand College, Kolhapur (Autonomous)***

Submitted to

**Internal Quality Assurance Cell (IQAC)**

***Vivekanand College, Kolhapur (Autonomous)***

**(2020 – 21)**

## Introduction

Mahalaxmi (Ambabai) temple built in an ancient time is an excellent architectural design with natural stones. Kirnotsav at Mahalaxmi (Ambabai) temple, Kolhapur, Maharashtra is one of the most awaited festivals for a people from Maharashtra and other states. It is also becoming popular amongst people from other countries. During 'Dakshinayan' and Uttarayan of sun the sun rays' traverse about 200 meters, from Mahadwar arch to idol goddess Mahalaxmi (Ambabai). During 'Dakshinayan' of Sun (November 9,10 and11) and Uttarayan of Sun (January 31 and February 1 and 2) sun rays spectacularly illuminates an entire path, that dominates reddish golden sunrays stemming from longer wavelength of solar spectrum (650-700 nm). The typical path following by sun rays during 'Dakshinayan' is: Mahadwar road arch (5.00pm), Garud mandup back side (5.17pm), Garud mandup (5.21 pm), Ganapati mandir back side (5.26 pm), Kasav chowk (5.32pm), Pitali Umbhartha (5.37 pm), Khajina chowk (5.39 pm), Garbhgruha first step (5.41 pm), Garbhgruha second step (5.42 pm), Garbhgruha third step (5.43 pm), Garbhkuti (5.43 to 5.44 pm), Katanjan (5.44 pm), idol (5.45 to 5.49 pm). In Uttarayan of sun the typical path following by sun rays is Mahadwar road arch (5.18 pm), Garud mandup back side (5.36pm), Garud mandup (5.41 pm), Ganapati mandir back side (5.44 pm), Kasav chowk (6.00pm), Pitali Umbhartha (6.05 pm), Khajina chowk (6.07 to 6.08 pm), Garbhgruha first step (6.10 pm), Garbhgruha second step (6.11 pm ), Garbhgruha third step (6.12 pm), Garbhkuti first step(6.12 to 6.13pm), Katanjan (6.14 pm), idol (6.15 to 6.19 pm). The entire event of 3 days is supposed to be highly sacred and religious. Thus, attracts about 30 thousand people every day. It is supposed to be very fortune and life fulfilling event for all those who attended it personally.

Kirnotsav has been always the topic of great enthusiasm and full of complexities. Hence previously some people tried to undertake its scientific study. However due to many reasons, for several years the festival did not take place full-fledged i.e. sun rays did not reached up to the face of the idol or covers entire idol, and the overall light intensity as the path was reduced.

## Contribution by Faculty of Department of Physics, Vivekanand College, Kolhapur

Prof. (Dr) Milind Manohar Karanjkar, Head, Department of Physics and Astrophysics, Vivekanand College, Kolhapur (Autonomous) and his team of students decided to work on these problems scientifically to overcome the problem and get remedy on it, few years back.

The team of researchers have observed following problems:

1) The heavy traffic at nearby places of temple and human interference created enormous amount of dust particles that scatter sun light and deviate their path. This lessens the intensity of sun rays and their amount which are not enough to illuminate full idol, with desired intensity.

2) A crowd of about 2000 people, gathered inside the temple, caused dramatic increase in abnormal humidity. This refracts the sun rays to a great extent.

3) In addition, direct human interference in the pathway obstructs sun rays.

4) The nearby shopkeepers used to lighten their shops, which increased stray light.

5) Further obstructions occurred due to building, water tanks, trees, hoardings and electric cables.

6) Furthermore fog, smog, smokes, clouds, rain storm, winds, cared natural obstructions.

The humidity, intensity of light, wind speed and temperature were continuously monitored and studied accurately with the help of Data logger, Lux meter, Anemometer and Thermal gun. The

systematic record of all these physical parameters at various locations within the temple. The final plan was worked out accordingly, to observe full-fledged Kirnotsav.

Printed from
**THE TIMES OF INDIA**

## Kirnostav festival: Sun rays reach till waist of the deity at Mahalaxmi

TNN | Feb 1, 2017, 06.02 AM IST



KOLHAPUR: The first day of second Kiranotsav festival on Tuesday saw rays of the sun reaching till the waist of the deity at Mahalaxmi temple.
In another development, the Mahalaxmi Kiranotsav Marg Nischitikaran Samiti came up with a fixed map of the sun's movement and will soon submit it to the town planning department of the Kolhapur Municipal Corporation (KMC).

The Mahalaxmi temple is built in such a manner that sun rays reaches in sanctum sanctorum twice a year— Uttarayan (sun moving towards North) and Dakshinayan (sun moving towards South). The ongoing festival will culminate on February 2.

On Day 1 of the festival, more than 10,000 devotees attended the festival. However, for the past few years the sun rays have not been covering entire deity due to various reasons, including air pollution.

Member of the Mahalxmi Kirnostav Marg Nischitikaran Samiti and environmental activist Uday Gaikwad said, "The town planning department of KMC had formed a committee to study the path of sun's movement and asked to finalise a path. We are in the last leg of fixing the path. We will soon submit the maps to the town planning department."

Milind Karanjkar, a researcher at Vivekanand College, said, "We have been mapping and testing intensity of sun rays since the last two days. We registered that high intensity of sun rays is reaching the temple. We would sit together with temple management and suggest measures to prevent deviations in its path."

### Following tasks are undertaken to solve the above problems/difficulties.

1) Considering the human interference, the major obstacle; the initial steps are taken to convince people to observe and see the phenomenon live on screen, placed in the temple premises. This was only possible with the cooperation and arrangement made by Shri. Mahesh Jadhav, Chiarman, Paschim Maharashtra Devasthan Samiiti, Kolhapur and his official team. Further he made the live streaming of the event through website of devasthan samiiti, local TV channels and other electronic medias to avoid crowd inside the temple. Subsequently, this help reducing the amount of dust particles, humidity, temperature, physical obstruction by the people. The illumination intensity is dramatically improved.

2) Only optimal no. of people (20) allowed including print and electronic media persons, office staff of the devasthan samiiti and priests inside the temple during the kirnotsav time. Paschim Maharashtra Devasthan samitii request to stake holders to remove the water tanks on the buildings and apartments, temporarily extension shades advertising boards on the shop, some electricity cables on the way, trees on the path are trimmed. It is seen that the sun rays travel in proper way and reaches to deity at the proper place and the kirnotsav is successfully complete both in the 'Dakshinayan' and 'Uttarayan' properly and required lux level is obtained.

3) All the incandescent lamps high mask lamos are replaced by LED to reduce power consumption and ambient temperature.

4) The subsequent reflection came due to vitrified tiles, fitted in the temple, obstruct resultant intensity. The path of the sun rays is covered by cloth mats to reduce reflection of light to avoid light interference. This minimizes the loss of sunrays during their journey. The intensity, temperature, humidity, wind speed and direction of sunrays are monitored during kirnotsav.

## Conclusion: (Kirnotsav, during the ‘Dakshinayan’ of Sun)

In the current situation study/results indicates that if environment is clear, no dense clouds in the sky, no dust particles, no pollutants, and if only optimal no. of people (maximum 20) enter inside the temple during the period of Kirnotsav i.e. from 5.00 pm to 5.55 pm (‘Dakshinayan’ of sun), the sunrays festival called as Kirnotsav succeeds for five days.

After successful study of kirnotsav, during the ‘Dakshinayan’ of the sun, we noticed /found that festival occurs during November 9, 10, 11, 12 and ends on November 13. i.e after two days of previous dates announced (09 November to 11 November).

Further as per our observations the study shall be extended up to 14, and 15 Nov. to check the sun rays reaches or not on deity. If above mentioned factors are up to the required mark the period of ‘Dakshinayan’ Kirnotsav may be ends/last on 15 Nov. 2020. (up to seven days)

## Conclusion: (Kirnotsav, during the ‘Uttarayanyan’ of Sun)

In the current situation the study/results indicates that if environment is clear, no dense clouds in the sky, no dust particles, no pollutants, and if only optimal no. of peoples (maximum 20) enter inside the temple during the period of Kirnotsav i.e. from 5.15 pm to 6.20 pm (‘‘Uttarayanyan’’ of sun), the sunrays festival called as Kirnotsav succeeds for five days.

After successful study of kirnotsav, during the ‘‘Uttarayanyan’ of the sun, we noticed /found that, festival occurs during January 29, 30, 31, February 01 and ends on February 02. i.e two days early of previous dates announced (31 January to February 1, 2). Further as per our observations the study shall be started from 27 and 28 January to check the sun rays reaches or not on deity. If above mentioned factors are up to the required mark the period of ‘‘Uttarayanyan’ Kirnotsav may be up to seven days.

# Letter by Shree Mahalaxmi Karveer Nivasini Temple Office

WESTERN MAHARASHTRA DEVASTHAN MANAGEMENT COMMITTEE

पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समिती

**श्रीमहालक्ष्मी करवीर निवासिनी मंदिर ऑफिस**

**SHREE MAHALAXMI KARVEER NIVASINI TEMPLE OFFICE**

कोल्हापूर. फोन : २५४१७७९ KOLHAPUR. PHONE : 2541779

जावक क्र. : 　　　　　　　　　　दिनांक :

The team led by Dr. Milind M. Karanjkar from Department of Physics, Vivekanand College, Kolhapur is investigating several aspects of environmental pollution and subsequent impact on ambience of Shri. Mahalaxmi temple, Kolhapur. This temple is being visited by several lakhs of devotees every year and is one of the popular and sacred places in southern Maharashtra.

It was observed by the team that inside the Garbhkuti, the average values of temperature and humidity were 36.1°C and 84% respectively. There were several incandescent and florescent lamps installed in the temple, which were causing rise in temperature and humidity. The power consumption was also substantial. However, as per the suggestion of the team, the temple committee installed LEDs. LED is the latest lighting technology, which helps in keeping the surrounding temperature low as it is a cold source of light. Due to LED lights installation both the temperature and humidity were brought down substantially to 32.5 °C and 72% respectively. This results into the creation of good ambience in Garbhkuti that help Pujari's and devotee's and all other people who visit the temple. Similarly the LED installations have caused substantial reduction in power consumption. The electricity bill of Rs. 1.65 Lakh was reduced to Rs. 1.40 Lakhs.

Manager,

*Shri Karveer Nivasini (Mahalaxmi) Devasthan.*

*Sub - Office, Kolhapur (Maharashtra).*

WESTERN MAHARASHTRA DEVASTHAN MANAGEMENT COMMITTEE
पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समिती
श्रीमहालक्ष्मी करवीर निवासिनी मंदिर ऑफिस
SHREE MAHALAXMI KARVEER NIVASINI TEMPLE OFFICE
कोल्हापूर. फोन : २५४१७७९ KOLHAPUR. PHONE : 2541779

जावक क्र. :

दिनांक :

The team led by Dr. Milind M. Karanjkar from Department of Physics, Vivekanand College, Kolhapur is investigating several aspects of environmental pollution and subsequent impact on ambience of Shri. Mahalaxmi temple, Kolhapur. This temple is being visited by several lakhs of devotees every year and is one of the popular and sacred places in southern Maharashtra.

*"Kiranotsav"* is one of the most unique and an interesting festival celebrated twice a year (in the month of November and January-February). During this period at the time of sunset, rays travel from Mahadwar-Garud Mandap-Ganapati Mandir-Kasav Chowk-Pitali Umbaratha-Khajina Chowk-Garbhagriha-Garbhkuti-Godess Mahalaxmi, stepwise. This takes about 20 minutes for rays to travel from Mahadwar to Godess Mahalaxmi. This depends on sun's altitude and azimuth positions. The team narrates the detailed scientific information about this festival to all the devotees.

However, recently there was some problems in *"Kiranotsav"* , due to which the festival did not take place properly. The reasons behind this incomplete *"Kiranotsav"* festival are studied by this team. It is observed that some obstacles and pollution level are the key factors affecting this phenomenon.

**Manager,**
**Shri Karveer Nivasini (Mahalaxmi) Devasthan**
**Sub - Office, Kolhapur (Maharashtra).**

# Photographs of Kirnotsav (2020 – 21)




Prof. Dr. Milind Karanjkar, Head, Department of Physics, Vivekanand College, Kolhapur (11/11/2020)




Prof. Dr. Milind Karanjkar, Head, Department of Physics, Vivekanand College, Kolhapur (11/11/2020)

# Newspaper Cuttings (2020 – 21)



## अंबाबाई मंदिरात आजपासून किरणोत्सव

### पाच दिवस होणार किरणांचा अभ्यास

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ७ : करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिर भाविकांना दर्शनासाठी अद्यापही बंदच आहे. मात्र, परंपरेप्रमाणे होणारा किरणोत्सवाचा सोहळा उद्या (ता. ८) पासून होणार असून, सलग पाच दिवस किरणांचा अभ्यास केला जाणार आहे.

दरम्यान, देवस्थान समिती व विवेकानंद कॉलेजचे प्रा. मिलिंद कारंजकर आणि टीमने कालपासूनच मावळतीच्या सूर्यकिरणांची पाहणी सुरू केली आहे. पहिल्याच दिवशी मावळतीची सूर्यकिरणे देवीचा चरणस्पर्श करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मंदिरात वर्षातून दोन वेळा किरणोत्सवाचा सोहळा होतो. पूर्वी तीन दिवसांचा असणारा हा सोहळा अलीकडच्या काळात पाच दिवसांचा असल्याचे स्पष्ट करून देवस्थान समितीने गेल्या वर्षीपासून पाच दिवसांचा सोहळा जाहीर केला.

त्यानुसार आता सलग पाच दिवस हा सोहळा होईल. मात्र, मंदिर भाविकांना दर्शनासाठी बंद असल्याने कुणालाही प्रवेश दिला जाणार नाही.



कोल्हापूर : किरणोत्सवाचे संग्रहित छायाचित्र.



महत्त्वाचे



## अंबाबाई मंदिरात आजपासून किरणोत्सव

**कोल्हापूर :** करवीर निवासिनी अंबाबाई मंदिरात रविवारपासून (दि. ८) किरणोत्सवाला प्रारंभ होत आहे. १२ नोव्हेंबरपर्यंत हा किरणोत्सव असणार आहे. दरम्यान, ९ ते ११ नोव्हेंबर या कालावधीच किरणोत्सव सोहळा पाहिला जात असे. मात्र किरणोत्सव हा पाच दिवसांचाच असल्याचे पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीने सांगितले आहे. त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून ५ दिवस किरणोत्सव सोहळा पाहिला जात आहे. शनिवारी मावळतीच्या किरणांची तीव्रता पाहण्याबरोबरच प्रत्यक्ष किरणे अंबाबाईच्या मूर्तीवर कुठेपर्यंत पोहोचतात याची पाहणी विवेकानंद कॉलेजचे प्रा. मिलिंद कारंजकर आणि देवस्थान समितीने केली. दरम्यान, कोरोनामुळे अद्यापही अंबाबाई मंदिर भाविकांसाठी बंद असल्याने किरणोत्सवाचा आनंद श्री अंबाबाई लाईव्ह दर्शन या ॲपवरच लुटावा लागणार आहे.

Daily Sakal dated 08/11/2020

सोमवार, ९ नोव्हेंबर २०२०

# सूर्यकिरणे पितळी उंबरठ्यापर्यंत

## अंबाबाई किरणोत्सवाला प्रारंभ : ढगाळ वातावरणाचा ठरला अडसर

प्रतिनिधी
कोल्हापूर

करवीर निवासिनी अंबाबाई मंदिरात रविवारपासून किरणोत्सवाला प्रारंभ झाला. पहिल्याच दिवशी सायंकाळच्या सुमारास ढगाळ वातावरणामुळे सूर्यकिरणे अंबाबाईच्या मूर्तीपर्यंतसुद्धा पोहोचलीत नाहीत. फारच कमी तिव्रतेने मंदिरात प्रवेश केलेली सूर्यकिरणे पितळी उंबरठ्यापर्यंत पोहोचली. यानंतर ढगाळ वातावरण सूर्यकिरणांच्या आड आल्याने पुढील एकाच मिनिटात मात्र किरणे मंदिरातूनच लुप्त झाली.

दरम्यान, कोरोनामुळे अंबाबाई मंदिर भाविकांसाठी अद्यापही बंदच आहे. त्यामुळे हजारो भाविक श्री अंबाबाई लाईव्ह दर्शन या ॲपच्या माध्यमातून किरणोत्सव पाहण्यात मग्न झाले होते. मात्र सूर्यकिरणे अंबाबाईच्या मूर्तीपर्यंतही न पोहोचल्याने त्यांची निराशा झाली.



कोल्हापूर : पहिल्या दिवशी मंदिरात आलेल्या सूर्यकिरणांची तिव्रता अभ्यासताना प्रा. डॉ. मिलिंद कारंजकर व देवस्थान समिती कर्मचारी प्रशांत आंबेकर. (छाया : शशिकांत मोरे)

सायंकाळी ५ वाजून ३ मिनिटांनी किरणोत्सवाला सुरुवात झाली. यावेळी किरणे अंबाबाई मंदिराच्या महाद्वारवर आली होती. ही किरणे ५ वाजून १७ मिनिटांनी गरुड मंडपापर्यंत पोहोचली. यानंतर ५ वाजून २२ मिनिटांनी ही किरणे गरुड मंडपात गेली. पुढील दहा मिनिटांनी ती गणपती चौकापर्यंत पोहोचली. येथून ५ वाजून ३४ मिनिटांनी कासव चौकात गेली. तसेच ५ वाजून ३७ मिनिटांनी किरणे पितळी उंबरठ्यापर्यंत पोहोचली. मात्र पुढील एकाच मिनिटात किरणांच्या आड ढगाळ वातावरण आले आणि किरणे लुप्त झाली.

किरणोत्सवाला प्रारंभ झाल्यापासून तो संपेपर्यंत किरणांची तिव्रता अभ्यासण्याचे काम विवेकानंद महाविद्यालयाचे प्रा. डॉ. मिलिंद कारंजकर व देवस्थान समितीचे कर्मचारी राहुल जगताप, प्रशांत आंबेकर व अभिजित पाटील यांनी केले. पहिल्या दिवशी मात्र ढगाळ वातावरणामुळे किरणे पाहता आली नाहीत.

Daily Tarun Bharat dated 09/11/2020

कोल्हापूर, सोमवार, ९ नोव्हेंबर २०२०

# ढगाळ वातावरणामुळे किरणे पितळी उंबऱ्यापर्यंतच

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

किरणोत्सवाच्या पहिल्या दिवशी रविवारी अंबाबाई मंदिराच्या पितळी उंबऱ्यापर्यंत किरणे पोहोचून लुप्त झाली. दरवर्षी किरणोत्सव क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी हजारो भाविकांची मंदिरात गर्दी होत असते; पण यंदा कोरोनामुळे भाविकांना हा सोहळा पाहता आला नाही

दरवर्षी नोव्हेंबर महिन्याच्या साधारणत: पहिल्या आठवड्यात दक्षिणायन किरणोत्सवास प्रारंभ होतो. सायंकाळी सूर्य मावळतीला लागला तसे ५ वाजून ९ मिनिटांनी सूर्याची किरणे महाद्वार रोडवर आली. यानंतर सूर्य अस्ताला जात असताना ५ वाजून २२ मिनिटांनी ही किरणे गरूड मंडपापर्यंत पोहोचली. गेल्या काही वर्षांपासून किरणोत्सव मार्गातील अढथळ्यांमुळे किरणे देवीपर्यंत पोहोचत नव्हती. त्यामुळे यंदा ही किरणे कुठे पर्यंत पोहोचतात याबाबत भाविकांमध्ये उत्सुक्ता होती.

सायंकाळी ५ वाजून ३२ मिनिटांनी किरणे कासव चौकात आली. ढगाळ वातावरणामुळे किरणांची तीव्रता कमी होत गेली. ५ वाजून ३७ मिनिटांनी किरणे पितळी उंबऱ्यापर्यंत पोहोचून लुप्त झाली. याबाबत खगोलशास्त्राचे अभ्यासक प्रा. मिलींद कारंजकर यांनी सायंकाळी उन्हाची तीव्रता मोजली. वातावरणातील आर्दते मुळे किरणे मंदिराच्या गाभाऱ्यापर्यंत पोहोचली नसल्याचे सांगितले. सोमवारी असेच वातावरण राहण्याची शक्यता असल्याचे त्यांनी सांगितले.

**करवीर निवासिनी अंबाबाई किरणोत्सव**



कोल्हापूर : ढगाळ वातावरणामुळे रविवारी किरणे अंबाबाई देवी मंदिराच्या पितळी उंबऱ्यापर्यंत पोहोचून लुप्त झाली. (छाया : पप्पू अत्तार)

Daily Pudhari dated 09/11/2020

लोकमत
सोमवार ९.११.२०२०



दिवसभर ढगाळ वातावरण आणि महाद्वार रोडवर दिवाळीनिमित् असणारी वर्दळ व हवेत असणारी जादा आर्द्रतेमुळे पहिल्या दिवशी किरणे पितळी पायरीपर्यंतच पोहोचली.

-प्रा. मिलिंद कारंजकर, खगोलशास्त्रीय अभ्यासक

करवीरनिवासिनी कोल्हापूरच्या अंबाबाई देवीच्या किरणोत्सवास रविवारपासून सुरुवात झाली. पहिल्या दिवशी ढगाळ वातावरणामुळे किरणांची तीव्रता कमी झाल्याने ती पितळी उंबऱ्यापर्यंत पोहोचून लुप्त झाली. (छाया : नसीर अत्तार)

# पहिल्या दिवशी किरणे पितळी उंबऱ्यापर्यंतच

## अंबाबाई किरणोत्सव : ढगाळ वातावरण

■ लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : करवीरनिवासिनी कोल्हापूरच्या अंबाबाई देवीच्या दक्षिणायन किरणोत्सवास रविवारपासून सुरुवात झाली. ढगाळ वातावणामुळे पहिल्या दिवशी किरणे देवीच्या पितळी उंबऱ्यापर्यंत पोहोचून लुप्त झाली.

अंबाबाई देवीचा दक्षिणायन किरणोत्सव सोहळा खऱ्या अर्थाने आज, सोमवारपासून तीन दिवस म्हणजे ९, १० आणि ११ या तारखांना होतो. मात्र, गेल्या काही वर्षांपासून किरणोत्सवाच्या सुरुवातीच्या एक दिवस अगोदर व संपणाऱ्या शेवटच्या दिवसानंतरचा एक दिवस असे पाच दिवस साजरा केला जातो. त्यानुसार किरणोत्सवाच्या पहिल्या दिवशी पाच वाजून ३७ मिनिटांनी किरणे पितळी उंबऱ्यापर्यंत पोहोचून लुप्त झाली.

### किरणांचा प्रवास असा

महाद्वार रोड - ५ वा. ०८ मि.

गरुड मंडप मागील बाजू -५वा.१७ मि.

गरुड मंडप - ५ वाजून २२ मिनिटे

गणपती मंदीर मागील जीना - ५ वाजून २६ मिनिटे

कासव चौक - ५ वाजून ३२ मिनिटे

पितळी उंबऱ्यापर्यंत - ५ वाजून ३७ मिनिटे

कोल्हापूर, सोमवार, ९ नोव्हेंबर २०२०    ३

# किरणोत्सवाच्या पहिल्या दिवशी ढगांचा अडथळा

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ८ : करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिरात आजपासून किरणोत्सवाला प्रारंभ झाला. मात्र, सोहळ्याच्या पहिल्याच दिवशी ढगाळ वातावरणामुळे मावळतीची सूर्यकिरणे देवीच्या मूर्तीपर्यंत पोचू शकली नाहीत. गुरुवार (ता. १२) पर्यंत हा सोहळा होणार आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मंदिर दर्शनासाठी बंद असल्याने यंदा भाविकांशिवाय हा सोहळा साजरा होत आहे.

मावळतीच्या सूर्यकिरणांनी गरुड मंडपामार्गे मंदिरात प्रवेश केला. मात्र, सायंकाळी पाच वाजून ३७ मिनिटांपासून पुढे तीन मिनिटे सूर्यकिरणे येथेच थांबली आणि पुढे नाहीशी झाली.

याबाबत डॉ. मिलिंद कारंजकर म्हणाले, "गेल्या दोन दिवसांपासून मावळतीच्या सूर्यकिरणांचा अभ्यास सुरू आहे. आज पहिल्या दिवशी किरणांचा चरणस्पर्श होईल, अशी अपेक्षा होती. मात्र, खरेदीसाठी झालेली गर्दी, त्यामुळे हवेत वाढलेले धूलीकण, आर्द्रता यामुळे प्रखर सूर्यकिरणे पोचू शकली नाहीत."

Daily Lokmat and Daily Sakal dated 09/11/2020

# सूर्यकिरणे गुडघ्यापर्यंत

## अंबाबाई किरणोत्सव : दुसऱ्या दिवशीही ढगाळ वातावरण

■ लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोल्हापुरातील श्री अंबाबाईच्या किरणोत्सवात सोमवारी सायंकाळी ५ वाजून ४६ मिनिटांनी सूर्यकिरणे देवीच्या मूर्तीच्या गुडघ्यापर्यंत आली. थंडीचे दिवस आणि ढगाळ वातावरणामुळे सूर्यकिरणांची तीव्रता कमी होती.

श्री अंबाबाई मंदिरात वर्षातून दोनदा किरणोत्सव सोहळा होतो. या वर्षातील दुसरा किरणोत्सव रविवारपासून सुरू झाला. पहिल्या दिवशी किरणे पितळी उंबऱ्यापर्यंत येऊन लुप्त झाली. तुलनेने सोमवारी किरणांची तीव्रता चांगली होती. सायंकाळी पाच वाजता किरणे महाद्वार कमानीजवळ आली. येथून गरुड मंडप, कासव चौक, पितळी उंबरा, कटांजन असा प्रवास करीत किरणांनी ५ वाजून ४५ मिनिटांनी मूर्तीचा चरणस्पर्श केला. येथे एक मिनिट स्थिरावल्यानंतर ५ वाजून ४७ व्या मिनिटाला गुडघ्यापर्यंत आली. गुडघ्यावर एक मिनिट स्थिरावल्यानंतर किरणे डावीकडे लुप्त झाली.



श्री अंबाबाई मंदिरात सोमवारी किरणोत्सव सोहळा झाला. दुसऱ्या दिवशी सूर्यकिरणे देवीच्या मूर्तीच्या गुडघ्यापर्यंत आली होती. (छाया : आदित्य वेल्हाळ)

### किरणांचा प्रवास असा

| | |
|---|---|
| सायं. ५.०० महाद्वार कमान | सायं. ५.२० गरुड मंडप |
| सायं. ५.३३ कासव चौक | सायं. ५.३७ पितळी उंबरा |
| सायं. ५.४० चांदीचा उंबरा | सायं. ५.४१ पहिली पायरी |
| सायं. ५.४२ दुसरी पायरी | सायं. ५.४४ कटांजन |
| सायं. ५.४५ चरणस्पर्श | सायं. ५.४६ गुडघ्यापर्यंत |

आज, मंगळवारी किरणे कमरेपर्यंत येण्याची शक्यता आहे. यावेळी देवस्थान समितीचे अध्यक्ष महेश जाधव, सदस्य शिवाजीराव जाधव, राजू जाधव, सचिव विजय पोवार, प्रा. मिलिंद कारंजकर उपस्थित होते.

Daily Lokmat dated 10/11/2020

• कोल्हापूर, मंगळवार, १० नोव्हेंबर २०२०

# सूर्यकिरणे पोहचली मूर्तीच्या गुडघ्यापर्यंत

» श्री अंबाबाई किरणोत्सव

## भाविकांसाठी लाईव्ह प्रक्षेपण

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ९ : करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिरातील किरणोत्सव सोहळ्याच्या दुसऱ्या दिवशी आज मावळतीची सूर्यकिरणे देवीच्या मूर्तीच्या गुडघ्यांपर्यंत पोचली. काल पहिल्या दिवशी चरणस्पर्श अपेक्षित होता. मात्र, ढगाळ वातावरणामुळे सूर्यकिरणांची प्रखरता कमी राहिली. आज मात्र स्वच्छ वातावरणामुळे किरणोत्सवाचा सोहळा भाविकांना ऑनलाईन अनुभवता आला. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मंदिर भाविकांना दर्शनासाठी बंद असल्याने यंदा भाविकांविना हा सोहळा होत आहे.

सायंकाळी पाच वाजता महाद्वार कमानीत सूर्यकिरणे आली. त्यानंतर अकरा मिनिटांनी ती गरूड मंडपात पोचली. पाच वाजून ३१ मिनिटांनी कासव चौक, पाच वाजून ३७ मिनिटांनी पितळी उंबरा, त्यानंतर दोन मिनिटांनी चांदीचा उंबरा, पाच वाजून ४१ मिनिटांनी पहिली पायरी, त्यानंतर दोन मिनिटांनी तिसरी पायरी असा प्रवास करत पाच वाजून ४५ मिनिटांनी किरणांनी मूर्तीचा चरणस्पर्श केला. त्यानंतर दोन मिनिटांनी किरणे मूर्तीच्या गुडघ्यापर्यंत पोचली आणि डावीकडे लुप्त झाली, अशी माहिती प्रा. मिलिंद कारंजकर यांनी दिली.

पान ४ वर »



कोल्हापूर : किरणोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी सोमवारी मावळतीची सूर्यकिरणे मूर्तीच्या गुडघ्यापर्यंत पोचली. (बी.डी.चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

### मणकर्णिका कुंडाचे काम लवकरच पूर्ण होणार

मणकर्णिका कुंडाच्या कामाचा आढावा घेण्यासाठी आज देवस्थान समिती व संबंधित घटकांची बैठक झाली. रामाचा पार व मणकर्णिका कुंडाचे काम वेगाने सुरू असून, लवकरच ते पूर्ण होईल, अशी माहिती देण्यात आली.

## सूर्यकिरणे पोहचली मूर्तीच्या गुडघ्यापर्यंत

» पान १ वरून

दरम्यान, हा सोहळा देवस्थान समितीच्या वतीने सर्व डिजिटल प्लॅटफॉर्मवरून भाविकांना अनुभवायला मिळत असल्याचे समितीचे अध्यक्ष महेश जाधव यांनी सांगितले. यावेळी समिती सदस्य शिवाजीराव जाधव, राजेंद्र जाधव, सचिव विजय पोवार आदी उपस्थित होते.

Daily Sakal dated 10/11/2020

कोल्हापूर, बुधवार,
११ नोव्हेंबर २०२०

» श्री अंबाबाई किरणोत्सव



कोल्हापूर : करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिरातील किरणोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी मावळतीची सूर्यकिरणे मूर्तीच्या कमरेच्या वरपर्यंत पोचली. (बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

# देवीचे मुखकमल सूर्यकिरणांनी उजळणार?

## भाविकांत उत्सुकता; डिजिटल प्लॅटफॉर्मवरून प्रसारण

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १० : करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिरातील किरणोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी आज मावळतीची सूर्यकिरणे देवीच्या मूर्तीच्या कमरेच्या वरपर्यंत पोचली. त्यामुळे आता उद्या (बुधवारी) देवीचे मुखकमल मावळतीच्या सूर्यकिरणांनी उजळणार का, याबाबत भाविकांत उत्सुकता लागून राहिली आहे. दरम्यान, आजही स्वच्छ वातावरणामुळे सूर्यकिरणांची प्रखरता अधिक राहिली. देवस्थान समितीच्या सर्व डिजिटल प्लॅटफॉर्मवरून सोहळ्याचे प्रसारण सुरू आहे.

सायंकाळी पाच वाजून दोन मिनिटांनी महाव्दारात सूर्यकिरणे पोचली. त्यानंतर तेरा मिनिटांनी गरूड मंडपात, पाच वाजून वीस मिनिटांनी चौथऱ्यापर्यंत तर पाच वाजून ३३ मिनिटांनी कासव चौकापर्यंत किरणे पोचली.

त्यानंतर चार मिनिटांनी पितळी उंबरा, पाच वाजून ३९ मिनिटांनी चांदीचा उंबरा, पाच वाजून ४१ मिनिटांनी पहिली पायरी, पाच वाजून ४५ मिनिटांनी चरणस्पर्श केला आणि पाच वाजून ४८ मिनिटांनी मूर्तीच्या कमरेच्या वरच्या भागापर्यंत पोचत ती डावीकडे लुप्त झाली, असे प्रा. मिलिंद कारंजकर यांनी सांगितले. यावेळी देवस्थान समितीचे अध्यक्ष महेश जाधव, शिवाजीराव जाधव, राजेंद्र जाधव, सचिव विजय पोवार आदी उपस्थित होते.

Daily Sakal dated 11/11/2020

epaper.lokmat.com
बुधवार, दि. ११ नोव्हेंबर २०२०

# सूर्यकिरणे अंबाबाईच्या कंबरेपर्यंत

## किरणोत्सवाचा तिसरा दिवस : आज चेहऱ्यावर येण्याची शक्यता

■ लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** करवीरनिवासिनी श्री अंबाबाईच्या किरणोत्सवात मंगळवारी सूर्यकिरणे देवीच्या मूर्तीच्या कमरेपर्यंत आली. सायंकाळी पाच वाजून ४५ मिनिटांनी चरणस्पर्श केलेली किरणे पाच वाजून ४८ मिनिटांपर्यंत कमरेच्या वर येऊन डावीकडे लुप्त झाली. मंगळवारप्रमाणेच किरणांची तीव्रता चांगली राहिली; तर आज बुधवारी किरणे चेहऱ्यावर येऊन किरणोत्सव पूर्ण होण्याची शक्यता आहे.

अंबाबाईचा किरणोत्सव रविवार (दि. ८) पासून सुरू झाला असून, मंगळवारी किरणांची तीव्रता चांगली होती. थंडीचे दिवस असल्याने महाद्वारात अतितीव्र असलेली किरणे गाभाऱ्यापर्यंत येईपर्यंत मात्र कमी होत जातात. मंगळवारी सायंकाळी पाच वाजून दोन मिनिटांनी मावळतीची सूर्यकिरणे महाद्वार कमानीत आली. येथून पुढे गरुड मंडप, चौथरा, कासव चौक, पितळी उंबरा, चांदीचा उंबरा, पहिली पायरी असा प्रवास करीत किरणांनी पाच वाजून ४५ मिनिटांनी मूर्तीचा चरणस्पर्श केला. त्यानंतर पाच वाजून ४६, ४७, ४८ व्या मिनिटांनी किरणे कमरेच्या वरपर्यंत आली.

मंगळवारप्रमाणेच आज, बुधवारीदेखील किरणांची तीव्रता चांगली राहिली तर सूर्यकिरणे चेहऱ्यापर्यंत येऊन किरणोत्सव पूर्ण होईल. हा सोहळा १२ तारखेपर्यंत होऊ शकतो, अशी माहिती प्रा. मिलिंद कारंजकर यांनी दिली. यावेळी देवस्थान समितीचे अध्यक्ष महेश जाधव, सदस्य शिवाजीराव जाधव, राजू जाधव, आदी उपस्थित होते.



कोल्हापुरातील श्री अंबाबाईच्या किरणोत्सवात तिसऱ्या दिवशी मंगळवारी सूर्यकिरणे देवीच्या कमरेच्या वर आली. (छाया : आदित्य वेल्हाळ)

### किरणांचा प्रवास असा

- ५ वाजून २ मिनिटे : महाद्वार कमान
- ५ वाजून १५ मिनिटे : गरुड मंडप
- ५ वाजून २० मिनिटे : चौथरा
- ५ वाजून ३३ मिनिटे : कासव चौक
- ५ वाजून ३७ मिनिटे : पितळी उंबरा
- ५ वाजून ३९ मिनिटे : चांदीचा उंबरा
- ५ वाजून ४१ मिनिटे : पहिली पायरी
- ५ वाजून ४५ मिनिटे : चरणस्पर्श
- ५ वाजून ४८ मिनिटे : कमरेच्या वर

गुरुवार, १२ नोव्हेंबर २०२०

# सूर्यकिरणे मूर्तीच्या खांद्यापर्यंत

■ अंबाबाई किरणोत्सव : आज अखेरचा पाचवा दिवस

प्रतिनिधी
कोल्हापूर

किरणोत्सवाच्या चौथ्या दिवशी (बुधवारी) सूर्यकिरणे अंबाबाई मूर्तीच्या खांद्यापर्यंत पोहोचली. चार वाजून ५९ मिनिटांनी अंबाबाई किरणोत्सवाला सुरूवात झाली होती. यावेळी सूर्यकिरणांनी अंबाबाई मंदिराच्या महाद्वार कमानीतून प्रवेश केला. तसेच या किरणांची तीव्रता कमी होती.

बुधवारी सूर्यकिरणे ही अंबाबाई मूर्तीच्या म्हाळूंगा–खांद्यापर्यंत पोहचली. देवीच्या खांद्यापर्यंत सूर्यकिरणे पोहचल्यानंतर उजव्या बाजूला लूप्त झाली. हवेत असणारे धुलीकरण व काही अंशी ढगांची चादर असल्यामुळे सुर्यकिरणांची तीव्रता कमी होती. अभ्यासाच्या दृष्टीकोनातून किरणोत्सवाच्या पाच दिवसांपैकी बुधवारी चौथा दिवस होता. गुरूवारी (दि. १२) किरणोत्सवाचा पाचवा अखेरचा दिवस आहे. पूर्वीपासून परंपरिक पध्दतीने किरणोत्सव हा ९, १० व ११ नोव्हेंबर रोजी साजरा होतो.



कोल्हापूर : बुधवारी चौथ्या दिवशी सूर्यकिरणे मूर्तीच्या खांद्यापर्यंत पोहोचली. (छाया : शशिकांत मोरे)

Daily Lokmat dated 11/11/2020 and Daily Tarun Bharat dated 12/11/2020

epaper.lokmat.com
शुक्रवार, दि. १३ नोव्हेंबर २०२०
लोकमत
४ वर्ल्ड वाईड



५ वाजून ४३ मिनिटे : कटांजन | ५ वाजून ४४ मिनिटे : चरणस्पर्श | ५ वाजून ४६ मिनिटे : खांद्यापर्यंत | ५.४७ ते ५.५० मिनिटे : सूर्यस्नान

कोल्हापुरातील श्री अंबाबाईच्या दक्षिणायन किरणोत्सवात गुरुवारी मावळतीची सूर्यकिरणे अंबाबाईच्या मुखावर येऊन किरणोत्सव पूर्ण झाला. (छाया : आदित्य वेल्हाळ)

# दक्षिणायन किरणोत्सवात अंबाबाईला सूर्यस्नान

## सोनसळी किरणांचा अभिषेक : किरणोत्सवाचा पाचवा दिवस; आजही पूर्ण क्षमतेने होण्याची शक्यता

■ लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : करवीरनिवासिनी श्री अंबाबाईच्या दक्षिणायन किरणोत्सवात गुरुवारच्या मावळतीला अंबाबाईच्या मूर्तीस सूर्यस्नान झाले. सोनसळी किरणांनी सायंकाळी पाच वाजून ४७ व्या मिनिटांनी देवीच्या मुखावर येत तिला अभिषेक घातला. दक्षिणायन किरणोत्सव दोन दिवस उशिरा होत असल्याने आज, शुक्रवारीदेखील पूर्ण क्षमतेने किरणोत्सव होण्याची शक्यता आहे.

करवीरनिवासिनी श्री अंबाबाईच्या दक्षिणायन किरणोत्सवाचा गुरुवारी पाचवा दिवस होता. हा अखेरचा दिवस असल्याने या दिवशी तरी सूर्यकिरणे देवीच्या चेहऱ्यापर्यंत जाऊन किरणोत्सव पूर्ण होईल, अशी अपेक्षा सार्थ ठरली. सायंकाळी पाच वाजता महाद्वार कमानीतून आलेल्या किरणांनी प्रवासाचा एक-एक टप्पा पार करीत पाच वाजून ४४ व्या मिनिटांनी देवीचा चरणस्पर्श केला. त्यानंतर पुढे सरकत-सरकत पाच वाजून ४७ व्या मिनिटांनी किरणे चेहऱ्यावर आली. अगदी किरिटापर्यंत जात तब्बल चार मिनिटे किरणे देवीच्या मुखावर स्थिरावली आणि पाच वाजून ५० व्या मिनिटांनी ती लुप्त झाली. यावेळी देवस्थान समितीचे सदस्य शिवाजीराव जाधव, सचिव विजय पोवार, राहुल जगताप, आदी उपस्थित होते. गेल्या चार दिवसांच्या तुलनेत किरणांची तीव्रता खूप चांगली होती. शिवाय धुलिकण व धुक्याचे प्रमाणही कमी होते. त्यामुळे किरणोत्सव पूर्ण क्षमतेने झाला. मात्र यंदा देवीच्या नावाचा गजर करण्यासाठी मंदिरात भाविकच नव्हते.

### दक्षिणायन दोन दिवस उशिरा

नोव्हेंबर महिन्यात होणारा दक्षिणायन किरणोत्सव हा दोन दिवस उशिराने सुरू होतो; त्यामुळे ९ ते १३ नोव्हेंबर हा किरणोत्सवाचा खरा कालावधी असणार आहे. परिणामी आज, शुक्रवारीदेखील असेच स्वच्छ वातावरण राहिले तर पूर्ण क्षमतेने किरणोत्सव होईल, अशी माहिती प्रा. मिलिंद कारंजकर यांनी दिली.

Daily Lokmat dated 13/11/2020

शुक्रवार, १३ नोव्हेंबर २०२०



कोल्हापूर : किरणोत्सवाच्या पाचव्या दिवशी सूर्यकिरणे अंबाबाईच्या मुखकमलापर्यंत पोहोचली होती. (छाया : शशिकांत मोरे)

# सूर्यकिरणांनी तेजाळले अंबाबाईचे मुखकमल

प्रतिनिधी
कोल्हापूर

किरणोत्सवात सूर्यकिरणे अंबाबाईच्या मुखकमलापर्यंत जाऊन स्थिरावल्याची पाहणे हे भाग्याचे समजले जाते. मात्र गेली चार दिवस अनेक कारणांनी सूर्यकिरणे अंबाबाईच्या मुखकमलापर्यंत पोहोचू शकली नव्हती. बुधवारी (दि. ११) तर सूर्यकिरणे अंबाबाईच्या खांद्यापर्यंत पोहोचली होती. त्यामुळे गुरुवारी नक्की मूर्तीच्या मुखकमलापर्यंत सूर्यकिरणे जाऊन स्थिरावतील, अशी आशा भाविक बाळगून होते. त्यांची ही आशा सत्यात उतरली आणि मावळतीच्या सूर्यकिरणांनी चक्क अंबाबाईच्या मुखकमलाचे दर्शन घेतले. तब्बल ४ मिनिटे मुखकमलावर किरणे स्थिरावली होती.

सायंकाळी ५ वाजता किरणोत्सवाला सुरुवात झाली आणि किरणे अंबाबाई मंदिराच्या महाद्वारावर पडली. पुढे ही किरणे ५ वाजून ३२ मिनिटांनी मंदिरातील कासव चौकात तर ५ वाजून ३७ मिनिटांनी पितळी उंबरठ्यापर्यंत पोहोचली. यानंतर ५ वाजून ४४ मिनिटांनी किरणांनी अंबाबाईच्या चरणाला स्पर्श केला. पुढील तीनच मिनिटात सूर्यकिरणे अंबाबाईच्या किरीटापर्यंत पोहोचली आणि ४ मिनिटे अंबाबाई स्थिरावली.

Daily Tarun Bharat dated 13/11/2020

शुक्रवार, १३ नोव्हेंबर २०२०

# सूर्यकिरणांचा अंबाबाई देवीस सोनेरी अभिषेक

## अखेरच्या दिवशी पूर्ण क्षमतेने किरणोत्सव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मावळतीच्या सूर्यकिरणांनी मूर्तीसह मुखकमल, किरीटला सोनेरी अभिषेक घातल्याने जगदंबेचा गाभारा पूर्णपणे उजळून निघाला. अंबाबाई मंदिरातील किरणोत्सव दक्षिणायन किरणोत्सव सोहळ्याच्या अखेरच्या दिवशी गुरुवारी ५.४८ मिनिटांनी सूर्यकिरणे पूर्ण अंबाबाईदेवीच्या मूर्तीवर पडली आणि त्यानंतर किरीटपर्यंत जाऊन लुप्त झाली.


अंबाबाई मंदिरात गेले चार दिवस सुरू असलेल्या किरणोत्सव सोहळ्याला दररोज सूर्यकिरणे मूर्तीपर्यंत पोहोचून लुप्त होत होती. यावर्षी अडथळ्यांमुळे किरणोत्सव होणार की नाही याची उत्कंठा भाविकांमध्ये होती. गुरुवारी दिवसभर किरणांची तीव्रता चांगली होती. सायंकाळी ५ वाजता महाद्वार कमानीवर किरणे पोहोचली तर ५.४३ मिनिटांनी किरणांनी मूर्तीला चरणस्पर्श केला. ५.४८ वाजता सूर्यकिरणांनी जगदंबेच्या मूर्तीला पूर्णपणे सोनेरी अभिषेक करून पुढील ४ मिनिटे किरणे मूर्तीवर स्थिर होती. ५.५० वा.नंतर श्रींचे मुखकमल आणि नंतर किरीट प्रकाशमान केल्यावर किरणे डावीकडे लुप्त झाली. पूर्ण क्षमतेने किरणोत्सव झाल्यामुळे देवस्थान समिती, मंदिर अभ्यासक आणि भाविकांकडून समाधान व्यक्त होत आहे. देवस्थान समितीमार्फत यावर्षी किरणोत्सव सोहळ्याची ऑनलाईन दर्शन सुविधा उपलब्ध करण्यात आली होती. या उपक्रमात राजू थोरात, संजय कुलकर्णी, जितेंद्र मुदगल, अमोल [illegible]ट्टी, देवदत्त आमले, राहुल जगताप सहभागी झाले होते.

### किरणांचा प्रवास

। गरुड मंडप : ५.०४ वा. । कासव चौक : ५.३२ वा. । कटांजल : ५.४२ वा. । चरणस्पर्श : ५.४३ वा. । पूर्ण मूर्तीला अभिषेक : ५.४८ वा. । किरीटवर : ५.५० वाजता

शुक्रवार, १३ नोव्हेंबर २०२०

## सुवर्णकिरणांचा अभिषेक!



कोल्हापूर : करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिराच्या किरणोत्सवाअंतर्गत मावळतीच्या सूर्यकिरणांनी देवीची संपूर्ण मूर्ती उजळून निघाली. सूर्याच्या दक्षिणायन कालखंडातील किरणोत्सवाची गुरुवारी सांगता झाली. सायंकाळी ५ वाजून ४४ मिनिटांपासून पुढील चार मिनिटे हा किरणोत्सव सुरू होता. या दरम्यान ढग आडवे आले; पण काही काळातच ते बाजूला गेल्याने देवीची मूर्ती किरिटापासून ते चरणापर्यंत सूर्यकिरणांनी उजळली. किरणोत्सव म्हणजे वास्तुकौशल्याचा आविष्कारच आहे. ही माहिती खगोल अभ्यासक प्रा. मिलिंद कारंजकर यांनी दिली. (छाया : पप्पू अत्तार)

Daily Pudhari dated 13/11/2020



कोल्हापूर, शुक्रवार, १३ नोव्हेंबर २०२० ३

# अंबाबाईच्या मूर्तीला सोनसळी अभिषेक

## अखेरच्या दिवशी किरणोत्सव पूर्ण क्षमतेने

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १२ : करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिरातील किरणोत्सवाच्या अखेरच्या दिवशी आज मावळतीच्या सूर्यकिरणांनी श्री अंबाबाईच्या मूर्तीवर अभिषेक घातला. सायंकाळी पाच वाजून ४४ मिनिटांपासून सलग चार मिनिटे हा नयनरम्य सोहळा यानिमित्ताने अनुभवता आला. दरम्यान, किरणोत्सवादरम्यान एक ढग आडवा आला; पण काही काळातच तो बाजूला गेला आणि किरणोत्सव पूर्ण क्षमतेने साजरा झाला. देवीच्या मूर्तीच्या किरिटापासून ते चरणापर्यंत संपूर्ण मूर्ती लखख सूर्यकिरणांनी न्हाऊन निघाली.

महाद्वार कमानीजवळ पाच वाजता सूर्यकिरणे आली. त्यानंतर सहा मिनिटांनी गरूड मंडपात किरणे आली. पाच वाजून सतरा मिनिटांनी चौथ्यापर्यंत त्यानंतर पाच वाजून ३२ मिनिटांनी कासव चौकात, पाच वाजून ३७ मिनिटांनी पितळी उंबरा, पाच वाजून ४३ मिनिटांनी कटांजन असा प्रवास करत पाच वाजून ४४ मिनिटांनी किरणांनी चरणस्पर्श केला. पुढे चार मिनिटे संपूर्ण मूर्तीवर किरणांनी जणू अभिषेकच घातला, अशी माहिती प्रा. डॉ. मिलिंद कारंजकर यांनी दिली. यावेळी देवस्थान समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

**अडथळा काढला...**

किरणोत्सव सुरू असताना किरणोत्सव मार्गातील एका इमारतीच्या छतावरील पत्र्याचा त्रिकोणी भाग अडथळा ठरत असल्याचे काल लक्षात आले. त्यानुसार आज हा अडथळा काढण्यात आला. त्याशिवाय वातावरण स्वच्छ असल्याने किरणोत्सव पूर्ण क्षमतेने झाला.

**गतवर्षीची पुनरावृत्ती...**

किरणोत्सव पाच दिवसांचा साजरा करण्याचा निर्णय देवस्थान समितीने घेतला. तेव्हापासून किरणोत्सवाअगोदर काही दिवस व त्यानंतर काही दिवस सूर्यकिरणांची पाहणी सुरू केली. गेल्या नोव्हेंबरमध्ये झालेल्या किरणोत्सवावेळीही शेवटच्या दिवशी म्हणजेच बारा नोव्हेंबरला मावळतीच्या सूर्यकिरणांनी मूर्तीवर सोनसळी अभिषेक केला होता. किरणोत्सवाच्या अभ्यासाचा अहवाल देवस्थान समितीकडे लवकरच पाठवला जाणार आहे.

कोल्हापूर : अंबाबाई मंदिरातील किरणोत्सव गुरुवारी पूर्ण क्षमतेने साजरा झाला. मावळतीच्या सूर्यकिरणांनी जणू संपूर्ण मूर्तीवर सोनसळी अभिषेकच केला. (बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

Daily Sakal dated 13/11/2020



epaper.lokmat.com

कोल्हापूर, शनिवार, दि. १४ नोव्हेंबर २०२०

कोल्हापुरातील श्री अंबाबाईच्या दक्षिणायन किरणोत्सवात सलग दुसऱ्या दिवशी (शुक्रवारी) सूर्यकिरणे अंबाबाईच्या चेहऱ्यावर आली. (छाया : आदित्य वेल्हाळ)

# किरणोत्सवात अंबाबाईच्या चेहऱ्यावर किरणे

■ लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : श्री अंबाबाईच्या दक्षिणायन किरणोत्सवात शुक्रवारी सलग दुसऱ्या दिवशी सूर्यकिरणे अंबाबाईच्या चेहऱ्यावर आली. सायंकाळी ५ वाजून ४५ व्या मिनिटाला किरणांनी चरणस्पर्श केला. पुढे ५ वाजून ४४ ते ४९ मिनिटांपर्यंत किरणे देवीच्या चेहऱ्यावर स्थिरावून डावीकडे लुप्त झाली.

किरणोत्सव आठ तारखेपासून सुरू झाला. आजवर हा सोहळा पाच दिवसांचा होतो. यंदा मात्र सहाव्या दिवशीदेखील किरणोत्सव होऊन सूर्यकिरणे अंबाबाईच्या चेहऱ्यावर आली. सायंकाळी ५ वाजून १७ मिनिटांनी किरणे गरुड मंडपात आली. येथून पुढे कासव चौक, पितळी उंबरा, चांदीचा उंबरा, कटांजन, चरणस्पर्श करून किरणे देवीच्या मुखावर गेली.

अभ्यासकांच्या मते, दक्षिणायन किरणोत्सव दोन दिवस उशिराने होतो. गतवर्षीदेखील हाच अनुभव आला. असे असेल तर ८ नोव्हेंबरऐवजी ९ नोव्हेंबरपासून किरणोत्सवाची तारीख धरण्याची गरज आहे.

Daily Lokmat dated 14/11/2020

# One Page Report

*"Dissemination of Education for Knowledge, Science and Culture"*

*- Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe*



Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

**Vivekanand College, Kolhapur (Autonomous)**

**Department of Physics**

KOLHAPUR

## One Page Report

| | | |
|---|---|---|
| | **Name of the Department** | Department of Physics |
| | **Name of the Activity** | "A scientific Study of Kirnotsav in Mahalaxmi (Ambabai) Temple, Kolhapur during 'Dakshinayan' and 'Uttarayan' of Sun" (2020 – 21). |
| | **Date / Duration** | 09 – 11 November 2020 |
| | **Aims and Objectives** | Mahalaxmi (Ambabai) temple built in an ancient time is an excellent architectural design with natural stones. Kirnotsav at Mahalaxmi (Ambabai) temple, Kolhapur, Maharashtra is one of the most awaited festivals for a people from Maharashtra and other states. It is also becoming popular amongst people from other countries. |
| | **No. of Beneficiaries** | (see table below) |
| | **Expenditure and Fundings** | College Funds |
| | **Brief Discussion** | During 'Dakshinayan' and Uttarayan of sun the sun rays' traverse about 200 meters, from Mahadwar arch to idol goddess Mahalaxmi (Ambabai). During 'Dakshinayan' of Sun (November 9, 10 and 11) sun rays spectacularly illuminates an entire path, that dominates reddish golden sunrays stemming from longer wavelength of solar spectrum. This year, due to clouds, the light rays could not reach to idol goddess Mahalaxmi. |
| | **Outcomes** | In the current situation, study/results indicates that cloudy Atmosphere affects the Kirnotsav festival. Along with dense clouds, dust particles and pollutants in the atmosphere reduces the intensity of sun rays reaching sanctum due to diffraction of sun rays from particles. When atmosphere is clear, Kirnotsav succeeds with sun rays covering dignity idol for approximately 10 min. |

No. of Beneficiaries:

| | | | |
|---|---|---|---|
| Teachers | Male | 01 | 01 |
| | Female | - | |
| Students | Male | - | - |
| | Female | - | |
| | | **Total** | **01** |

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

HoD

HEAD
DEPARTMENT OF PHYSICS
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(AUTONOMOUS)